# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)(ब-१)

## अन्वये आदेश.

जा.क्र.मुंबई/सनि/एसवि/आदेश/बी-१/ २१ /सन २०१८,
-: का   र्या   ल   य :-
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस-विभाग, मुंबई.
कक्ष क्र.२०२,दुसरा मजला कोकणभवन, नवी मुंबई-६१४.
दिनांक - ११/०१/२०१८

वाचावे:-१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)(ब-१) मधील तरतुद

२) अर्जदार श्रीमती शुभांगी परब व इतर यांचा तक्रार अर्ज दि.२०/९/२०१७ व दि. १३/११/२०१७

३) या कार्यालयाचे सुनावणी नोंटीस पत्र दिनांक १९/१२/२०१७.

४) संस्थेच्या सदस्यांचे सामूहीक राजीनामे बावत लेखी खुलासा पत्र दि.०४/१२/१७

ज्याअर्थी अनुभव को-ऑप हौसिंग सोसायटी लि., कोकणनगर,भांडूप (प)मुंबई-७८,ही संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था आहे. संस्थेचा नोंदणी क्रमांक बीओएम /डब्ल्यूएस /एचएसजी/ टीसी/६६४३/सन १९९२-९३/दि.३/२/१९९३ असा आहे. आणि,

ज्याअर्थी अनुभव को-ऑप हौसिंग सोसा लि, कोकणनगर भांडूप(प.),मुंबई-७८ (यापुढे अधिनियम असे वाचावे) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे)आणि संस्थेच्या मंजूर उपविधीतील तरतूदीनुसार संथेचे कामकाज व्यवस्थापक समितीने चालविणे बंधनकारक आहे आणि,

ज्याअर्थी वरील संदर्भिय क्रमांक २ अन्वये संस्थेच्या विदयमान व्यवस्थापक समिती विरुध्द अर्जदार श्रीमती शुभांगी परब व इतर यांनी लेखी तक्रार करण्यात आली होती. अर्जदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाने संस्थेस कार्यालयीने दिनांक २७/०९/२०१७ रोजीच्या पत्राने तक्रारी संदर्भात खुलासा सादर करणेबाबत लेखी कळविण्यात आले होते व संस्थेने दिनांक ०४/१२/२०१७ रोजीच्या पत्राने लेखी खुलासा सादर केलेला आहे आणि,

ज्याअर्थी वरिल संदर्भिय क्र.३ अन्वये या कार्यालयाने अर्जदार यांचे तक्रारीतील मुद्याबाबत वस्तुथिती पडताळणीसाठी प्रत्यक्ष सुनावणीसाठी संस्थेचे चेअरमन/सचिव व अर्जदार यांना दि.१९/१२/२०१७ राजीच्या सुनावणी नोटीसीने सुनावणीस बोलावण्यात आले आहे. दि.०५/०१/२०१८ रोजीच्या सुनावणी वेळी संस्थेचे सचिव श्री प्रेमानंद टिकम व अर्जदार श्रीमती शुभांगी परब व इतर उपस्थित होते. संस्थेचे सचिव यांचे म्हणणे पुढील कालावधीसाठी घ्यावयाची निवडणूक ही निवडणुक प्राधिकरण यांचेमार्फत घेणबाबतची पुर्वकल्पना संस्थेस नाही व सद्यस्थितीत व्यवस्थापक समिती सदस्यांनी राजीनामे दिलेले आहेत त्यामुळे संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणेबाबत विनंती करण्यात आली. करिता सदस्यांचे राजीनामे मंजुर करण्यात आले व संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्तिबाबतचा निर्णय घेण्यात आला आणि,

ज्याअर्थी विद्यमान व्यवस्थापक समिती सदस्यांनी राजीनामे दिल्यामुळे संस्थेच्या व्यवस्थापनात पोकळी निर्माण झालेली आहे. दैनंदिन कामकाज ठप्प झाल्यामुळे संस्था व सभासदांच्या हितास बाधा निर्माण होण्याची शक्यता असल्याने विद्यमान समिती बरखास्त करुन संस्थेचे दैनंदिन कामकाज व नवीन व्यवस्थापक समितीचे निवडणुकीची प्रक्रीया बाबत [illegible] [illegible] प्रभारी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ति करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)(ब-१), अन्वये व्यवस्थापक समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व संस्थेच्या व्यवस्थापनात पोकळी निर्माण

Scanned by CamScanner

झाल्यामुळे प्राधिकृत अधिकारी नियुक्ती बाबतची तरतुद असल्यामुळे खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**-:आदेश:-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)(ब-१) अन्वये मला प्राप्त अधिकारामुळे मी राजेश लव्हेकर,सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, एस विभाग,मुंबई, अनुभव को-ऑप हौसिंग सोसायटह लि, कोकणनगर,भांडूप (प)मुंबई-७८या संस्थेची व्यवस्थापक समिती बरखास्त करुन त्यांचेऐवजी श्री विवेक किनेकर यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ति करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी घ्यावयाच्या निवडणुकीसाठी नियमानुसार ई-१,ई-२, नमुन्यात निबंधक कार्यालयास एक महिन्याच्या आंत माहिती सादर करणे बंधनकारक आहे. प्राधिकृत अधिकारी यांचा कालावधी दप्तराचा ताबा घेतलेपासुन तीन महिने इतका राहिल.

सदरचा आदेश मी आज दिनांक ११/०१/२०१७ रोजी माझी स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

(राजेश लव्हेकर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था एस विभाग मुंबई

**प्रत:- माहितीसाठी**

१) **चेअरमन/सचिव,** अनुभव को-ऑप हौसिंग सोसायटह लि, कोकणनगर,भांडूप (प)मुंबई-७८
२/- यांनी त्वरीत नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांचेकडे दप्तराचा ताबा सुपुर्द करावा.

२) **श्री विवेक किनेकर,**प्राधिकृत अधिकारी, अनुभव को-ऑप हौसिंग सोसायटी लि. कोकणनगर,भांडूप (प)मुंबई-७८.
आपण त्वरीत संस्थेच्या नोटीस बोर्डावर आदेशाची प्रत चिपकावुन नियमानुसार दप्तराचा ताबा घ्यावा व सदरचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३) **शाखधिकारी,**मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, शाखा भाडूप/विक्रोळी/कांजुरमार्ग.
आपण त्वरीत संस्थेचे बँक खाते नवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांचे नावे नियमानुसार हाताळण्यात यावे.

४) स्थळ प्रत (क्र.०१ व ०२)

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था एस विभाग मुंबई

Scanned by CamScanner